जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १६७ | गुरुवार, ८ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

## संक्षिप्त

### मुंबईत राजू शेट्टींचा ठाकरे बंधूंना पाठिंबा

**मुंबई, ता. ७ :** मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी ठाकरे बंधूंना पाठिंबा दर्शवलाय. मराठी माणसाच्या भल्यासाठी मुंबईत ठाकरेच विजयी व्हावेत, आमची त्यांना सहानुभूती आहे, असे विधान त्यांनी केले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीकास्त्र सोडले. महाराष्ट्राचे किती प्रकल्प गुजरातला पाठवले, यावरून मुख्यमंत्र्यांचे मराठी प्रेम दिसून येते, असा टोला त्यांनी लगावला. शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा या मागणीसाठी धाराशिवमध्ये झालेल्या आंदोलनानंतर ते माध्यमांशी बोलत होते. महापालिकेच्या निवडणुकीत राज्यात इतर ठिकाणी काँग्रेसला पाठिंबा देणाऱ्या राजू शेट्टी यांनी मुंबईत मात्र ठाकरे बंधूंना पाठिंबा जाहीर केलाय. आमचे वैचारिक मतभेद असले तरीही मुंबईत मराठी माणसाच्या भल्यासाठी ठाकरे बंधूच विजयी व्हावेत असं राजू शेट्टी म्हणाले.

# पुणे महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपातील संघर्ष तीव्र

## अजित पवार व शरद पवारांची राष्ट्रवादी एकत्र आल्याने भाजपचे मिशन १२५ अडचणीत

**पुणे, ता. ७ :** राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात वातावरण तापत चालले आहे. एकीकडे बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेवकांवरून चर्चा सुरू असतानाच, दुसरीकडे प्रचारात राष्ट्रवादी आणि भाजप यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होत आहे. भाजप नेत्यांकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पूर्वी केलेल्या आरोपांची आठवण करून दिली जात असून, त्यामुळे पुणे-पिंपरीतील राजकीय वातावरण तापल्याचे दिसून येत आहे.




पुणे महापालिका निवडणुकीत भाजपने १२५ जागा निवडून आणण्याचे लक्ष्य ठेवले आहे. मात्र सत्तेत मित्र पक्ष असलेले अजित पवार हेच भाजपसाठी मोठे आव्हान ठरत असल्याची चर्चा आहे. निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीशी पुन्हा जवळीक साधल्याने भाजपच्या रणनीतीवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे भाजपचे मिशन १२५ अडचणीत येण्याची शक्यता असून पक्षाच्या गोटात चिंतेचे वातावरण असल्याचे बोलले जात आहे.

याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील भाजपच्या काही बड्या नेत्यांना कानउघडणी केल्याची माहिती राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. पुणे महापालिका निवडणुकीसाठी भाजपकडे २५०० पेक्षा अधिक इच्छुकांनी उमेदवारीसाठी अर्ज केले होते. मात्र उमेदवारी देताना अनेक जुने आणि निष्ठावंत कार्यकर्ते डावलले गेल्याने पक्षात नाराजी वाढली आहे.

या नाराजीचा फायदा घेत काही बंडखोर नेत्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करून थेट निवडणूक रिंगणात उडी घेतली आहे. त्यामुळे भाजपच्या मतांमध्ये फुट पडण्याची शक्यता असून याचा थेट परिणाम निवडणूक निकालांवर होऊ शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या परिस्थितीची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्याचे पक्षातील सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

सोमवारी रात्री कात्रज येथे मुख्यमंत्री फडणवीस यांची जाहीर सभा झाली. या सभेत मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी अजित पवार यांचे नाव न घेता अप्रत्यक्ष टीका केली. सभेनंतर मात्र राजकीय हालचाली अधिक वाढल्याचे दिसून आले. विमानतळाकडे जाताना मुख्यमंत्री फडणवीस, मुरलीधर मोहोळ आणि मंत्री चंद्रकांत पाटील हे तिघेही एकाच गाडीतून गेले. त्यानंतर विमानतळावर या तिन्ही नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा झाल्याची माहिती समोर आली.

या बैठकीत पुणे महापालिकेतील सुमारे १६५ जागांचा आढावा घेण्यात आला. ज्या प्रभागांमध्ये भाजपची स्थिती कमकुवत आहे किंवा जिथे सर्व्हेक्षणाचे निकाल विरोधात गेले आहेत, त्या ठिकाणी तातडीने राजकीय व्यूहरचना आखण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सांगितले जाते.

महापालिका निवडणुकीत सुमारे १२० नगरसेवक निवडून आणण्याचे लक्ष्य ठेवलेल्या भाजपने निष्ठावंतांपेक्षा नव्या उमेदवारांना संधी दिल्याने काही जागा धोक्यात आल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवरप्रचारासाठीपुण्यातआलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरिष्ठ नेत्यांची शाळा घेतली असून, धोकादायक प्रभागांकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना दिल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात येत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत पुण्यातील राजकारणात आणखी घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचे बिगुल लवकर वाजणार?

राज्यात २९ महापालिकांच्या निवडणुकांची धामधूम सुरू असतानाच आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्याही हालचाली वेग घेत आहेत. इच्छुक उमेदवारांनी प्रचाराला सुरवात केली आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून अद्याप निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला नाही. परंतु, याच आठवड्यात जाहीर करण्याची दाट शक्यता असून, ५० टक्के आरक्षण मर्यादेत येणाऱ्या संस्थांच्याच निवडणुका जाहीर केल्या जाणार आहेत.

## सासवड पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदारावर लाच मागीतल्याप्रकरणी गुन्हा

**सासवड, ता. ७ :** अदखलपात्र गुन्ह्यामध्ये कारवाई न करता त्यात मदत करण्याकरिता ५ हजार रुपयांची लाच सासवड पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदाराने मागितल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पडताळणीत समोर आले आहे. यामुळे पुणे जिल्हा (ग्रामीण) पोलीस दलात एकच खळबळ उडाली नाहे.

विकास लक्ष्मण ओमासे (वय ३९ रा. रूम नंबर १४ दुसरा मजला आनंद बाग सोसायटी सोनारी रोड, सासवड, पुणे (वर्ग-३) असे लाच मागणाऱ्या पोलीस हवालदाराचे नाव आहे. त्याच्यावर सासवड पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एका ३९ वर्षीय व्यक्तीने पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती.



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांचा भाजीपाला विक्रीचा व्यवसाय आहे. तक्रारदार यांच्या व त्यांचे वडीलांच्या विरुध्द सासवड पोलीस ठाण्यात अदखलपात्र (एनसी) गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यामध्ये कारवाई न करता त्यात मदत करण्याकरिता आरोपी लोकसेवक पोलीस हवालदार ओमासे यांनी तक्रारदार यांच्याकडे सुरवातीला ३ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. याप्रकरणी तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.

मिळालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता, तक्रारदार व त्यांचे वडील यांच्याविरुद्ध दाखल असलेल्या एन.सी. मध्ये तक्रारदार व त्यांचे वडिलांविरुद्ध कारवाई न करता त्यात मदत करण्याकरिता सुरवातीस १० हजार रुपयांची लाच मागून तडजोडीअंती ५००० रुपयाची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपी लोकसेवक विकास लक्ष्मण ओमासे याला ताब्यातघेऊन त्यांच्याविरुद्ध सासवड ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक आसायरी शेडगे करत आहेत.

## सांगलीच्या पोलीस अधिकाऱ्याची पुण्यातील लॉजमध्ये आत्महत्या

**पुणे, ता. ७ :** राज्याच्या पोलीस विभागातून एक खळबळजनक घटना समोर आली आहे. पुण्यात एका पोलीस अधिकाऱ्याने आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे. या घटनेमुळे पोलीस विभागात हळहळ व्यक्त केली जात आहे. सांगली पोलीस दलात कार्यरत असलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षकाने पुण्यातील एका लॉजमध्ये विष प्राशन करून जीवन संपवले आहे.

आत्महत्या केलेल्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव सूरज मराठे असे असून ते सांगली जिल्ह्यातील तासगाव येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. प्राथमिक माहितीनुसार, शारीरिक आजारपणाला कंटाळून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची शक्यता वर्तवली जात आहे. ही घटना पुण्यातीलडेक्कन पोलीस स्टेशन हद्दीतील एका लॉजमध्ये घडली आहे. सूरज मराठे यांची अवघ्या २५ व्या वर्षी सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून नियुक्ती झाली होती. पुणे जिल्ह्यातील देहू येथे त्यांचे कुटुंब वास्तव्यास आहे. सांगली पोलीस दलात कार्यरत असताना त्यांना काही दिवसांपासून आजारपणाचा त्रास होत होता. विशेषतः गुडघ्याच्या वेदनांमुळे ते उपचारासाठी वारंवार पुण्यात येत असल्याची माहिती आहे. याच कारणामुळे त्यांनी काही दिवसांची रजा घेतली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, उपचारासाठी पुण्यात आल्यानंतर सूरज मराठे संबंधित लॉजमध्ये थांबले होते. उपचार करून परत आल्यानंतर त्यांनी विष प्राशन करून आत्महत्या केल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेच्या ठिकाणी पोलिसांना एक चिठ्ठीही मिळाली असून, त्यामध्ये आजारपणाचा उल्लेख असल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र चिठ्ठीतील मजकूराबाबत पोलिसांकडून अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही.

## भिगवणमधील राष्ट्रवादी प्रवेशावरून राजकीय चर्चांना उधाण

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. ०७ : भिगवण येथे राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते सुमारे २२ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन पार पडले. उद्घाटनानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत माजी सरपंच पराग जाधव यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशाबाबत प्रश्न विचारला असता, कृषिमंत्री भरणे यांनी सांगितले, सोबत आहे म्हणल्यानंतर अधिकृत प्रवेश झाला आहे. जरी तो तुम्हाला दिसला नसला तरी तो मला दिसला आहे.



या वक्तव्यामुळे भिगवणच्या राजकीय वर्तुळात चर्चेला चालना मिळाली आहे. गेल्या वर्षभर भिगवण आणि परिसरातील गावांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणावर पक्षप्रवेश होणार अशी चर्चा होती. माजी व आजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सहकारी सोसायट्यांचे पदाधिकारी आणि विविध संघटनांचे नेते राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याची माहिती होती.

प्रत्यक्षात हा प्रवेश एका विकासकामाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने अधिकृत झाला, ज्यामुळे काही कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, हा प्रवेश प्रतीकात्मक आहे की व्यापक रणनीतीचा भाग, याबाबत मतभेद आहेत. भिगवण ग्रामपंचायत सध्या एका मातब्बर नेत्याच्या प्रभावाखाली असतानाही, जुने कार्यकर्ते आणि नव्या प्रवेशांमध्ये समन्वय साधून संघटनात्मक समतोल राखला जाईल का, हे येत्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे खजिनदार सचिन बोगावत म्हणाले, भिगवणमध्ये काही जणांचा अधिकृत प्रवेश झाला असला तरी, येणाऱ्या निवडणुकांमध्ये गेली १५ - २० वर्षे पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या जुन्या कार्यकर्त्यांना योग्य संधी मिळेल, असा विश्वास कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे आहे.

## दौंड–पाटस मार्गावरील हॉटेलमध्ये सिलेंडरचा स्फोट; दहा कर्मचारी भाजले, सहा जण गंभीर

**दौंड, ता. ७ :** दौंडपाटस मार्गावरील मांढरे मळा येथील हॉटेल जगदंबा येथे भटारखान्यातील घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरचा भीषण स्फोट होऊन दहा कर्मचारी भाजले गेले. यापैकी सहा जण गंभीररित्या जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी पुणे येथे हलविण्यात आले आहे.




दौंड शहरापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या हॉटेल जगदंबा येथे दुपारी हा स्फोट झाला. सिलेंडरचा स्फोट होताच हॉटेलमध्ये एकच खळबळ उडाली. स्फोटाच्या तीव्रतेमुळे हॉटेलचे पत्रे उडून गेले, तर दर्शनी भागातील काचेच्या खिडक्या तावदानासह खाली कोसळल्या. स्फोटात भाजलेल्या कर्मचाऱ्यांना मांढरे मळा येथील स्थानिक नागरिकांच्या मदतीने तातडीने दौंड शहरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी गंभीर जखमी कर्मचाऱ्यांना पुढील उपचारासाठी पुणे येथे पाठविण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच दौंड नगरपालिका व कुरकुंभ एमआयडीसी अग्निशामक विभागाच्या पथकांनी घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळविले. हॉटेलमध्ये मोठ्या प्रमाणात एलपीजी सिलेंडरचा साठा असल्याने परिस्थिती गंभीर बनली होती; मात्र अग्निशामक दलाने वेळीच कारवाई केल्याने पुढील अनर्थ टळला. दरम्यान, अग्निशामक विभागाने हॉटेलमधून एकूण २१ सिलेंडर बाहेर काढले असून त्यामध्ये घरगुती वापराचे १४ व वाणिज्य वापराचे ७सिलेंडर असल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, दौंड पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेत दहा जण भाजले असून सहा जण गंभीर जखमी झाल्याची माहिती दौंड पोलीस ठाण्याचे निरीक्षक गोपाळ पवार यांनी दिली.

## तणाव घालवायचा असेल तर खेळा; डीसीपी डॉ. राजकुमार शिंदेंचा मोलाचा सल्ला

**लोणी काळभोर, ता. ७ :** शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक आरोग्य, सामाजिक कौशल्ये आणि नेतृत्व क्षमता वाढवण्यासाठी सर्वांनी खेळने अत्यंत महत्त्वाचे आहे. खेळामुळे तणाव कमी होतो. एकाग्रता सुधारते व शिस्त लागते. ज्यामुळे व्यक्ती सर्वांगीण विकासाकडे वाटचाल करते. सध्याच्या युगात निरोगी राहण्यासाठी कामाबरोबर व्यायाम व खेळाकडेही लक्ष दिले पाहिजे. असे प्रतिपादन पुणे शहर पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी केले आहे.




महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन व पत्रकार दिनानिमित्त पोलीस व पत्रकार यांच्यामध्ये क्रिकेट सामन्याचे आयोजन लोणी काळभोर (ता. हवेली) येथे मंगळवारी (ता.६) करण्यात आले होते. यावेळी बोलताना वरील प्रतिपादन पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी केले. यावेळी लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के, रत्नदीप बिराजदार, प्रिंट व डिजिटल मिडिया पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र उर्फ बापूसाहेब काळभोर, पत्रकार व पोलीस बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोणी काळभोर येथील एमआयटी शैक्षणिक संकुलातील मैदानात पोलीस व पत्रकार यांच्यामध्ये क्रिकेट सामना रंगला. नाणेफेक जिंकुन लोणी काळभोर पोलीस संघाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पोलीस संघाने ५ षटकांत धावांचा डोंगर उभा केला. या धावसंख्येला प्रतिउत्तर देताना पत्रकार संघाकडुन कडवी झुंज दिली.

दरम्यान, या सामन्यामध्ये मॅन ऑफ द मॅच योगेश उदमले यांना देण्यात आले. तर पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांचे हस्ते सर्व पत्रकार बांधवांना गुलाब पुष्प देवुन पत्रकार दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या सामन्यासाठी हवेली डॉक्टर असोसियशन अध्यक्ष राहुल काळभोर व डॉ. रतन काळभोर यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

### अंबरनाथमध्ये काँग्रेसच्या ब्लॉक अध्यक्षांसह १२ नगरसेवक भाजपच्या वाटेवर

**अंबरनाथ, ता. ७ :** अंबरनाथ नगरपालिकेत भाजपसोबत छुपी युती केल्याचा ठपका ठेवत प्रदेश काँग्रेसने ब्लॉक अध्यक्ष प्रदीप पाटील यांच्यासह १२ नगरसेवकांचे निलंबन केले आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार ही कडक कारवाई करण्यात आली असून ब्लॉक कार्यकारिणीही बरखास्त करण्यात आलीय. दुसरीकडे, प्रदीप पाटील यांनी प्रदेशाध्यक्षांवर गंभीर आरोप केले असून, ब्लॉक अध्यक्षपदासाठी १ कोटींची मागणी करण्यात आली होती असा खळबळजनक दावा केलाय. काँग्रेसच्या या कारवाईनंतर राजकीय समीकरणे बदलली असून, पाटील आपल्या नगरसेवकांसह लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. निवडणुकीच्या तोंडावर हा काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जातोय.

पुणे प्राईम न्यूज

http://www.puneprimenews.com

# जे झालं ते गंगेला मिळालं; साहेबांचे नेतृत्व दूरदृष्टीचे; अजित पवारांकडून दरी मिटवण्याचे संकेत

**पिंपरी-चिंचवड, ता. ७ :** येथील महापालिका निवडणुकीच्या प्रचारात राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जोरदार फटकेबाजी केली. या सभेत बोलताना त्यांनी केवळ निवडणुकीपुरतंच नाही, तर भविष्यातही दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येऊ शकतात, असे स्पष्ट संकेत दिले.

सध्या पिंपरी-चिंचवड आणि पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढवत आहेत. याच पार्श्वभूमीवर अजित पवार म्हणाले, तुतारी आणि घड्याळ एकत्र लढत आहेत. आम्हाला भांडण नकोय. मागचं जे काही झालं ते आता गंगेला मिळालं. त्यांनी कार्यकर्त्यांना एकत्र राहून काम करण्याचं आवाहन केलं. काकांच्या पुण्याईमुळे माझं सगळं नीट चाललंय. मी खोटं बोलत नाही, असं म्हणत अजित पवारांनी थेट शपथ घेतली. माझी काळजी करू नका, असं सांगत त्यांनी शरद पवारांचं योगदानही मान्य केलं. हिंजवडी



आयटी पार्क शरद पवारांमुळेच उभा राहिला, असंही त्यांनी ठामपणे सांगितलं.

सभेत त्यांनी विरोधकांना थेट इशाराही दिला. ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी. मी कुणाच्या नादी लागत नाही, पण कोणी माझ्या नादी लागलं तर मी सोडत नाही, असं सांगत त्यांनी विरोधकांसह नाराज नेत्यांनाही कानपिचक्या दिल्या. पक्ष सोडून गेलेल्या नेत्यांवरही अजित पवार चांगलेच संतापले. मी ज्यांना ताकद दिली, तेच मला सोडून गेले. त्यांच्या मुलांवर काय आरोप होते हे ते विसरले. दादागिरी, दहशत आणि गुंडगिरी सुरू होती, असा आरोप त्यांनी केला. पिंपरी-चिंचवड महापालिकेतील भ्रष्टाचारावर बोलताना त्यांनी थेट आव्हान दिलं. भ्रष्टाचार करणाऱ्या आकाला संपवायचं आहे, असं म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे आमदार महेश लांडगे यांच्यावर निशाणा साधला. तो आका आपल्याला जागा दाखवायची आहे. काही जण सरड्यासारखे रंग बदलतील, भावनिक बोलतील, ही माझी शेवटची निवडणूक म्हणून पाय धरतील. पण तुम्ही त्यांना हरवल्याशिवाय त्यांची शेवटची निवडणूक होणार नाही, असं आवाहन त्यांनी मतदारांना केलं.

दरम्यान, एकीकडे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचे संकेत आणि दुसरीकडे भ्रष्टाचार, दहशत, गुंडगिरीवर थेट हल्ला या सगळ्यामुळे अजित पवारांच्या सभेनंतर पिंपरी-चिंचवडचं राजकारण पुन्हा एकदा चांगलंच तापलं आहे.

## संक्षिप्त

### पुणे जिल्हा राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी संभाजी नाना होळकर



**बारामती, ता. ७ :** इंदापूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदावरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात तणाव निर्माण झाल्यानंतर आता पक्षाने पुणे जिल्हा ग्रामीण कारभार नव्याने स्थापन केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी संभाजी नाना होळकर यांची पुणे जिल्हा ग्रामीण अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. त्यांच्याकडे बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर तालुक्यांची जबाबदारी देण्यात आली आहे.तथाकथित राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर, तत्कालिन राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी नगराध्यक्षपदासाठी निवडणूक लढवण्यासाठी पक्षाचा सदस्यत्व तसेच जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. निवडणुकीनंतर गारटकर अजित पवार यांच्याशी जुळवून घेऊन राजकारणात परत येणार असल्याचे समजले होते. मात्र, सध्या त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चाही रंगत आहेत. संभाजी होळकर हे अजित पवारांचे निकटवर्तीय असून, गेल्या २०-२५ वर्षांपासून पक्षात त्यांनी बारामती तालुक्याची जबाबदारी सांभाळली आहे. पक्षफुटीच्या कठीण काळातही त्यांनी अजित पवारांची साथ निभावली आहे. होळकर यांना आता जिल्ह्याचे कारभार सांभाळण्याची जबाबदारी दिल्यामुळे, पक्षाच्या वाढीसाठी आणि धोरणे जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले, संभाजी होळकर यांच्याकडे पुणे ग्रामीण जिल्ह्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

### लोहगावात दुचाकी घसरुन तरुणाचा मृत्यू

**वाघोली, ता. ७ :** भरधाव दुचाकी घसरुन तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना लोहगाव-वाघोली रस्त्यावर घडली. अपघातात दुचाकीवरील सहप्रवासी तरुण गंभीर जखमी झाला. प्रदीपसिंह रामेश्वरसिंह सेंगर (वय-४५, रा. लोहगाव) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. अपघातात सिकंदर अछाबर चौहान (वय-३३, रा. लोहगाव) जखमी झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार प्रदीपसिंह आणि त्यांचा मित्र सिकंदर हे १५ डिसेंबर रोजी लोहगाव-वाघोली रस्त्यावरुन निघाले होते. त्यावेळी भरधाव वेगात समोरुन एक वाहन आले. दुचाकीस्वार प्रदीपसिंह यांनी जोरात ब्रेक दाबला. नियंत्रण सुटल्याने दुचाकी घसरली. अपघातात दुचाकीस्वार प्रदीपसिंह यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. दुचाकीवरील सहप्रवासी सिकंदर यांना दुखापत झाली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या प्रदीपसिंह यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

## इम्तियाज जलीलांच्या कारवर हल्ला; गाडीतून बाहेर काढून मारण्याचा प्रयत्न

**छत्रपती संभाजीनगर, ता. ७ :** महापालिका निवडणुकीच्या प्रचार दरम्यान एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांच्या वाहनावर हल्ला झाला. ही घटना शहरातील बायजीपुरा-जिन्सी परिसरात घडली. हल्ल्यात एमआयएमचा एक कार्यकर्ता जखमी झाला आहे.



घटनेच्या सुरुवातीला काही व्यक्तींनी जलील यांना काळे झेंडे दाखवले, त्यानंतर जमाव आक्रमक होऊ लागला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी लाठीचार्ज केला. या प्रसंगात वाहनातील मागच्या सीटवर बसलेल्या व्यक्तीच्या डोळ्याला दुखापत झाली असल्याचे सांगितले जात आहे.

एमआयएमच्या वतीने या हल्ल्याचा आरोप काँग्रेसचे उमेदवार कलीम कुरेशी यांनी घडवून आणल्याचा करण्यात आला आहे. एमआयएमने संभाजीनगरमध्ये २१ नगरसेवकांची उमेदवारी कापून नव्या उमेदवारांना संधी दिली होती, ज्यामुळे पक्षात असंतोष होता. काही दिवसांपूर्वी इम्तियाज जलील यांचे छायाचित्र फाडून निषेध व्यक्त करण्याची घटना देखील घडली होती. दरम्यान, याघटनेनंतर इम्तियाज जलील यांचे समर्थक मोठ्या संख्येने एकत्र आले आणि प्रचंड गर्दी निर्माण झाली. हल्ल्याचा आरोप आर्थिक व्यवहार, तिकीट वाटप आणि पक्षातील राजकीय विरोधाभासाशी संबंधित असल्याचे एमआयएमच्या वतीने सांगण्यात आले आहे.

## हल्ल्यात जखमी झालेले काँग्रेसचे नेते हिदायत पटेल यांचा उपचारादरम्यान मृत्यू

**अकोला, ता. ७ :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष आणि अकोल्यातील ज्येष्ठ नेते हिदायत उल्लाखाँ पटेल यांची मंगळवारी हत्या करण्यात आली. अकोट तालुक्यातील म ोहाळा या त्यांच्या मूळ गावी हा प्रकार घडला. दुपारी झालेल्या या प्राणघातक हल्ल्यानंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मोहाळा गावात राजकीय कारणावरून वाद सुरू होता. मंगळवारी दुपारी मतीन पटेल यांच्या गटाने हिदायत पटेल यांच्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात पटेल हे गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने अकोला येथील खासगी रुग्णालयात हलवण्यात आले, पण शरीरावर वर्मी घाव बसल्याने त्यांचा मृत्यू झाला.

हिदायत पटेल हे अकोला जिल्ह्यातील काँग्रेसचे एक मोठे नाव होते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत त्यांनी काँग्रेसकडून निवडणूक लढवली होती. गावात दीर्घकाळापासून सुरू असलेल्या राजकीय संघर्षातूनच हा हल्ला झाल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी आणि समर्थकांनी केला आहे. या घटनेमुळे संपूर्ण अकोला जिल्ह्यात खळबळ उडाली असून काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

दरम्यान, हल्ल्याच्या घटनेनंतर मोहाळा गावात आणि अकोल्यातील रुग्णालयाबाहेर तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात केला आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

## भोरला पाणीपुरवठा करणारी मेन पाईपलाईन फुटली; लाखो लिटर पाणी वाया

इम्रान अत्तार

भोर, ता. ७ : भोर-कापूरहोळ रस्ता रुंदीकरणाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. मात्र या कामामुळे भोर शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. रस्ता रुंदीकरण करताना भोर शहराला पाणी पुरवणारी मुख्य जलवाहिनी वारंवार फुटत असल्याने हजारो लिटर पिण्याचे पाणी वाया जात आहे. गेल्या १ वर्षात ही वाहिनी तब्बल २९ ते ३० वेळा फुटली असून यामुळे पाण्याचा मोठा अपव्यय झाला आहे. प्रत्येक वेळी जलवाहिनी फुटल्याने शहराचा पाणीपुरवठा बंद होतो आणि नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो.



या प्रकारामुळे भोर नगर परिषदेला मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. वारंवार दुरुस्तीसाठी येणारा खर्च आणि वाया जाणारे पाणी यामुळे प्रशासनाचे नुकसान होत आहे. नगर परिषदेने संबंधित ठेकेदाराला अनेकवेळा लेखी व तोंडी सूचना देऊनही त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. ठेकेदार कोणत्याही प्रकारची खबरदारी न घेता काम करत असून नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनाही जुमानत नसल्याचा आरोप होत आहे. ठेकेदाराच्या या मनमानी कारभारामुळे शहरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

सततच्या हलगर्जीपणामुळे संबंधित ठेकेदारावर कडक कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहेत. रस्ता रुंदीकरण गरजेचे असले तरी सार्वजनिक सेवांचे नुकसान टाळणे ही ठेकेदाराची जबाबदारी आहे. या प्रकारामुळे पाणी प्रश्नासोबतच रस्त्यावर पाणी साचून अपघातांचा धोकाही वाढला आहे.

## समाज घडविण्यात पत्रकारांची भूमिका महत्त्वाची : उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर

गोरख जाधव

डोर्लेवाडी, ता. ०७ : पत्रकार हे समाजाचे प्रतिबिंब असून ब्रेकिंग न्यूजच्या धावपळीतही समाजाला दिशा देणाऱ्या सकारात्मक, आशादायी व विधायक बातम्या देणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन बारामतीचे उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांनी केले.



बारामती तालुका ग्रामीण पत्रकार संघ व सहेली फाउंडेशन, बारामती यांच्या वतीने मराठी पत्रकार दिनानिमित्त डोर्लेवाडी येथे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पत्रकार सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास तहसीलदार स्वप्नील रावडे, सरपंच सुप्रिया नाळे, सहेली फाउंडेशनच्या अध्यक्षा रोहिणी आटोळे, ग्रामपंचायत सदस्य राणी नेवसे, सचिन निलाखे, अभिनेते रामदास जगताप, पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमनाथ भिले, कार्याध्यक्ष युवराज खोमणे, उपाध्यक्ष राजेश वाघ, सचिव चिंतामणी क्षीरसागर यांच्यासह सुनील जाधव, जयराम सुपेकर, ॲड. गणेश आळंदीकर, महेश जगताप, दत्ता माळशिकारे व तालुक्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नावडकर म्हणाले की, शासकीय योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी वृत्तपत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना ही शेतकऱ्यांसाठी बहुउद्देशीय असून तिच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पत्रकारांनी सहकार्य करावे. तसेच पुण्यातून सुरू होत असलेली जागतिक दर्जाची सायकल स्पर्धा तिसऱ्या टप्प्यात सासवडनिरामोरगाव मार्गे बारामतीत येत असून, या स्पर्धेबाबत जनजागृती करून शालेय विद्यार्थी, युवक व नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग व्हावा, असे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, कार्यक्रमात सहेली फाउंडेशनच्या वतीने उपस्थित पत्रकारांचा स्मृतिचिन्ह व वृक्षरोप देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी रामदास जगताप व रोहिणी आटोळे यांनी मनोगत व्यक्त केले. पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष जयराम सुपेकर यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्ष सोमनाथ भिले यांनी सूत्रसंचालन केले, तर ॲड. गणेश आळंदीकर यांनी आभार मानले.

## कर्णधार वैभव सूर्यवंशीचे विश्वविक्रमी शतक



**मुंबई, ता. ०७ :** टीम इंडियाच्या अंडर १९ संघाचा कर्णधार वैभव सूर्यवंशी याने पुन्हा एकदा दमदार फलंदाजी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. साऊथ आफ्रिकेविरुद्ध झालेल्या तिसऱ्या वनडे सामन्यात वैभव सूर्यवंशीने आक्रमक खेळी करत अवघ्या ६३ चेंडूंमध्ये शतक झळकावले. पुढे खेळत असताना तो १२७ धावांवर बाद झाला.

वैभव सूर्यवंशीने ७४ चेंडूंमध्ये १२७ धावा केल्या. या खेळीत त्याने १० षटकार आणि ९ चौकार लगावले. त्याचा स्ट्राईक रेट १७१ इतका होता. विशेष म्हणजे या खेळीदरम्यान त्याने केवळ १९ चेंडूंमध्ये ९६ धावा काढल्या, हे त्याच्या आक्रमक फलंदाजीचे मोठे उदाहरण मानले जात आहे. त्यामुळे त्याच्या या खेळीची क्रिकेट वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

वैभव सूर्यवंशीला या सामन्यात आरोन जॉर्जन याची चांगली साथ मिळाली. आरोन जॉर्जने १०६ चेंडूंमध्ये ११८ धावांची शतकी खेळी केली. या खेळीत त्याने १४ चौकार मारले असून त्याचा स्ट्राईक रेट १११ होता.

या दोघांच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताच्या अंडर १९ संघाने २५० धावांचा टप्पा पार केला आहे. आता साऊथ आफ्रिकेसमोर किती धावांचे आव्हान ठेवले जाते आणि त्या धावांचा पाठलाग करताना त्यांची कामगिरी कशी राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## करमाळा तालुक्यात गावभेटींना वेग; पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांची रंगत वाढली

सागर घरत

करमाळा, ता. ०७ : आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर करमाळा तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला असून तालुक्याच्या राजकारणात चांगलेच चैतन्य निर्माण झाले आहे. विविध राजकीय गटांचे नेते, इच्छुक उमेदवार व त्यांचे समर्थक गावोगावी भेटी, बैठका व गाठीभेटींच्या माध्यमातून मतदारांशी संपर्क साधताना दिसत आहेत.



निवडणुकांची चाहूल लागताच इच्छुक उमेदवारांकडून सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी व प्रश्न जाणून घेण्यावर भर दिला जात आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य सेवा, शिक्षण तसेच शेतीविषयक समस्या या मुद्द्यांवर चर्चा करत मतदारांशी थेट संवाद साधला जात आहे. अनेक ठिकाणी छोट्या सभा, घराघरांत जाऊन संपर्क व स्थानिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

राजकीय पक्षांबरोबरच अपक्ष इच्छुकही सक्रिय झाले असून संभाव्य उमेदवारांची नावे चर्चेत येऊ लागली आहेत. कोणत्या गावात कोणता गट मजबूत आहे, याचा अंदाज घेण्यासाठीही या गावभेटी महत्त्वाच्या ठरत आहेत. निवडणुका जवळ आल्या की सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या आठवतात, अशी भावना काही ठिकाणी व्यक्त होत असली तरी याच काळात मतदारांच्या हाती भविष्यातील नेतृत्व निवडण्याची संधी असते, असे जाणकारांचे मत आहे.

दरम्यान, एकूणच करमाळा तालुक्यात पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांची रंगत वाढत असून येत्या काळात राजकीय घडामोडी आणखी वेग घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## अजित पवार यांना ब्लॅकमेल करून भाजपने राष्ट्रवादी फोडली : संजय राऊत यांचा गौप्यस्फोट

**मुंबई, ता. ७ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड येथे भाजप-वर सडकून टीका केली होती. भाजपची राक्षसी भूक मला पाहवत नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला होता. त्यांनी केलेल्या आरोपांनंतर राजकारण चांगले तापले होते. त्यानंतर अजित पवार आणि भाजपच्या नेत्यांमध्ये वार पलवावर सुरू झाले असून राजकीय संघर्ष निर्माण झाला आहे. या सगळ्या घडामोडींवर उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी गौप्यस्फोट करत मोठा दावा केला आहे.



अजित पवारांना ब्लेकमेलिंक करत असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे. तसेच अजित पवार यांना ब्लॅकमेल करून तुम्ही (भाजप) राष्ट्रवादी फोडली, असा गौप्यस्फोट संजय राऊत यांना केला आहे. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. तुमचा धंदा ब्लॅकमेलिंगचा आहे. तुम्ही ग्रेट गॅमलर आणि ग्रेट ब्लॅकमेलर आहात, अशी घणाघाती टीका देखील संजय राऊत यांनी भाजपवर केली आहे.

सगळ्याच्या बाबातीत ब्लँकमेंलिंगचे राजकारण सुरूच आहे. ही फाईल उघडी आहे ती फाईल उघडी आहे. अजित पवार यांना ब्लॅकमेल करून तुम्ही राष्ट्रवादी फोडली. एकनाथ शिंदे आणि चाळीस लोंकाना तुम्ही ब्लॅकमेल करून फोडलं. अशोक चव्हाण यांना ब्लॅकमेल करून फोडलं. तुमचा धंदा ब्लॅकमेलिंगचा आहे, तुम्ही ग्रेट गॅमलर आणि ग्रेट ब्लॅकमेलर आहात आणि तेच दिसत आहे.

भाजपचे नेते महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवार यांच्या विधानावर भाष्य करताना इतिहासाची पाने उघडायला भाग पाडू नका असे विधान करून इशारा दिला. यावर बोलताना संजय राऊत म्हणाले, बावनकुळे काय न्यायाधीश झाले आहेत का? की तपास अधिकारी? तुमचे वैचारिक मतभेत आहेत. बावनकुळे काय बडबडत आहेत. फडणवीस काय बोलतात आहेत. मग बसवा त्यांना समोर आणि द्या त्यांना सावकरांचे धडे अशा आक्रमक शैलीत राऊतांनी भाजपवर टीका केली आहे.

संजय राऊतांचा मोठा दावा पुढे बोलताना संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर देखील टीकीचे बाण सोडले. एकनाथ शिंदे असतील किंवा अजित पवार असतील यांचा संबंध फक्त पैसा सत्ता आणि गुंडगिरीशी आहे. जोपर्यंत सत्ता तुमच्याकडे आहे, तोपर्यंत ते तुमच्याबरोबर राहतील, उद्या आमची सत्ता आली तर आमच्या दारात येऊन उभे राहतील, असा मोठा दावा देखील संजय राऊतांनी बोलताना केला आहे.

# फिनिक्स मॉल प्रकल्पात कोट्यवधी रुपयांची फसवणूक; संचालकांविरोधात गुन्हा दाखल




**पुणे, ता. ७ :** पुण्यातील विमाननगर परिसरातील नामांकित इस्ट कोर्ट फिनिक्स मार्केट सिटी मॉल प्रकल्पात गुंतवणुकीच्या नावाखाली मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी मुंबईतील एका हॉटेल व्यावसायिकाची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला असून, फिनिक्स मिल्स लिमिटेड आणि वमोना डेव्हलपर्स प्रा. लि. या कंपन्यांच्या संचालकांसह एकूण १० जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुहू येथील रहिवासी आणि हॉटेल व्यावसायिक किशोर बलराम निचाणी यांनी विमाननगर पोलिसांकडे याबाबत फिर्याद दिली आहे.

निचाणी यांनी आपला रेस्टॉरंट व्यवसाय वाढवण्यासाठी २०१२ साली या मॉलमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला होता. त्या वेळी विकासकांकडून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा, मोठी ग्राहकसंख्या आणि दीर्घकालीन भाडेकरारातून चांगला परतावा मिळेल, असे आश्वासन देण्यात आले होते. या आमिषाला बळी पडून त्यांनी मॉलच्या दुसऱ्या मजल्यावरील १० युनिट्ससाठी सुमारे ३ कोटी ८५ लाख रुपये गुंतवले.

मात्र, प्रत्यक्षात जागेचा ताबा मिळाल्यानंतर आर्किटेक्टमार्फत केलेल्या मोजणीत करारात नमूद केलेल्या क्षेत्रफळापेक्षा १९३ चौरस फुट जागा कमी असल्याचे आढळून आले. याशिवाय टेरेसची जागा देणे आणि ठरलेला दीर्घकालीन भाडेकरार उपलब्ध करून देणे या बाबीही पूर्ण करण्यात आल्या नाहीत, असा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

इतकेच नव्हे तर प्रकल्पाचे पूर्णत्व प्रमाणपत्र नसतानाही मेंटेनन्स आणि कॉमन एरिया चार्जेसच्या नावाखाली सुमारे ४७ लाख रुपये बेकायदेशीरपणे वसूल करण्यात आल्याचेही समोर आले आहे.

सोसायटीची नोंदणी न करणे, मंजूर नकाशापेक्षा वेगळे बांधकाम करणे असे गंभीर गैरप्रकारही तक्रारीत नमूद आहेत. या सर्व प्रकारांमुळे आपले सुमारे २५ कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा निचाणी यांनी केला असून, विमाननगर पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

# गुन्हेगारी क्षेत्रात ‘‘चौपाटी राजा’’ नावाने कुप्रसिद्ध असणाऱ्या अट्टल गुन्हेगाराला अटक

**लोणी काळभोर, ता. ७ :** दरोडा घालण्याची पूर्वतयारी करणारा, जबरी चोरीच्या गुन्ह्यात पाहिजे असलेला आरोपी, बचक्या टोळीतील सराईत व ‘‘चौपाटी राजा ’’ नावाने कुप्रसिद्ध असणाऱ्या अट्टल गुन्हेगाराला गुन्हे शाखेच्या युनिट सहाने अटक केली आहे. गुन्हे शाखेने ही कारवाई कदम वाकवस्ती (ता. हवेली ) ग्रामपंचायत हद्दीतील अंगूर वाईन जवळ केली आहे.

राजेश उर्फ चौपाट्या बबलू मंगल मंडळ (वय २९ , रा. पठारे वस्ती, लोणी काळभोर, मूळ रा. दरबंगा, बिहार राज्य) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



गुन्हे शाखा युनिट ६ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक वाहीद पठाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेश उर्फ चौपाट्या मंडळ हा एक अट्टल गुन्हेगार आहे. त्याच्यावर बंड गार्डन पोलिस ठाण्यात ६, लष्कर व विश्रामबाग पोलिस ठाण्यात प्रत्येकी एक असे ८ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. तो एक रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे.

गुन्हे शाखेचे पथक आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने सराईत गुन्हेगारांचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार नितीन मुंढे यांना ’’चौपाटी राजा’’ नावाने कुप्रसिद्ध असलेला गुन्हेगार पुणे सोलापूर महामार्गालगत कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील अंगूर वाईन जवळ थांबला आहे. अशी माहिती एका खबऱ्यामार्फत मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकून आरोपीला मोठ्या शिताफीने अटक केली आहे.

दरम्यान, आरोपी राजेश मंडळ हा चौपाटी राजा नावाने कुप्रसिद्ध असुन दरोडा, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, मोबाईल चोरी करणारी सराईत बचक्या टोळीशी संबंधीत असुन सध्या तो मोक्का गुन्ह्यात जामिनावर होता. गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीला पुढील कारवाईसाठी बंडगार्डन पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे.

सदरची कामगीरी अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) निखिल पिंगळे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ६ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक वाहीद पठाण, सहाय्यक पोलिस निरीक्षक मदन कांबळे, पोलीस अंमलदार कानिफनाथ कारखेले, बाळासाहेब सकटे, कॉप्स २४ मार्शल अंमलदार तुळशीदास जाधव व महेंद्र आगळे, सारंग दळे, प्रशांत कापुरे, निलेश साळवे, गिरीष नाणेकर, निर्णय लांडे, नेहा तापकीर, ऋषीकेश ताकवणे, नितिन धाडगे, ऋषीकेश व्यवहारे, शेखर काटे, बाळासाहेब तनपुरे, प्रतिक्षा पानसरे, कीर्ती मांदळे व सोनाली नरवडे यांच्या पथकाने केली आहे.

# ‘भगवा’ शब्दामुळे भाजपाचे प्रचार गीत निवडणूक आयोगानं नाकारले

**मुंबई, ता. ७ :** मुंबई महापालिका निवडणुकीसाठी खूप कमी दिवस शिल्लक असल्याने सर्वच राजकीय पक्षांकडून प्रचारात कोणतीही कसर सोडली जात नसून, जोरात प्रचार सुरू आहे. खरंतर गेल्या काही दिवसांपासून थंडी सुरू असली तरी निवडणुकीमुळे मुंबईतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. भाजपकडून मुंबई निवडणुकीसाठी रणनिती आखण्यात आली असून त्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहे. मात्र, राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या एका निर्णयामुळे भाजपला ऐन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर मोठा धक्का बसला आहे.




मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजपने मोठ्या उत्साहात तयार केलेले विशेष प्रचार गीत वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या गीतामध्ये भगवा या शब्दाचा वापर केल्याने निवडणूक आयोगाने आचारसंहिता उल्लंघन केल्याचा ठपका ठेवला असून, या प्रचाराला गीताला परवानगी नाकारली आहे. त्यामुळे आता भाजपकडून नवीन गीत तयार करण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

राज्यातील २९ महापालिका निवडणुकीसाठी धुरळा उडला असून, सर्वच ठिकाणी भाजपकडून जोरदार शक्तीप्रदर्शन केले जात आहे. रॅली, सभांचा धडाका सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: सभेला जात असून, भाजप उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन नागरिकांना करत आहेत. दुसरीकडे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे देखील प्रचार सभेतून लोकांना आश्वात करताना दिसत आहेत.

या निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. भाजपने मुंबई महापालिका निवडणुकीसाठी कंबर कसली असून, जोरदार प्रचारमोहीम राबविली आहे. प्रचारासाठी भाजपने खास गीत तयार केले होते. पण आयोगाने गीतामधील भगवा या शब्दामुळे हे गीत नाकारले आहे. आता भाजपला पुन्हा एकदा नव्याने प्रचारगीत तयार करावे लागणार आहे.

# निमगिरी खून प्रकरणातील फरार आरोपीला अटक; जुन्नर पोलिसांकडे आरोपीचा ताबा

## आज न्यायालयात हजर करणार

**जुन्नर, ता. ७ :** जुन्नर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खून प्रकरणातील फरार आरोपीला वारजे पोलीस ठाण्याच्या पथकाने यशस्वी कारवाईत अटक केली आहे. घर व जमिनीच्या वादातून पत्नीचा निर्घृण खून केल्याप्रकरणी आरोपी फरार होता.

फिर्यादी शरद निंबा साबळे (वय ४२, रा. निमगिरी, ता. जुन्नर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सोमवारी (ता. ०५) सायंकाळी सुमारे पाऊणे सहा वाजता निमगिरी येथे घरासमोरील अंगणात आरोपी तुषार निंबा साबळे याने फिर्यादी यांच्या पत्नी अरुणा शरद साबळे (वय-३८) यांच्यावर चाकूने छाती व हातावर वार करून त्यांचा खून केला होता. या प्रकरणी जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. दरम्यान, तो वारजे परिसरात आल्याची खात्रीशीर माहिती वारजे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर रायगोंडा यांना मिळाली. त्यांनी ही माहिती तातडीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काइंगडे यांना दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वारजे येथील यशोदीप चौक परिसरात सापळा रचण्यात आला. आरोपी तेथे येताच पोलिसांनी झडप घालून त्याला ताब्यात घेतले. यानंतर ही बाब जुन्नर पोलीस ठाण्याला कळविण्यात आली. जुन्नर पोलिसांचे पथक तातडीने वारजे येथे दाखल झाले व उशिरा रात्री आरोपीचा ताबा घेऊन पुढील तपासासाठी जुन्नरकडे रवाना झाले. आरोपीला आज जुन्नर येथील न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

ही कारवाई पोलीस उपायुक्त (परिमंडळ -३) संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त कोथरूड विभाग डॉ. शीतल जानवे-खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काइंगडे, पोलीस निरीक्षक प्रकाश धेंडे व निलेश बडाख यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. या कारवाईत पीएसआय सिद्धेश्वर रायगोंडा, पीएसआय नायकवडे व पोलीस कॉन्स्टेबल चौधरी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## हिवाळ्यात गर्भवती महिलांनी आहारात कोणत्या गोष्टींचा समावेश करावा?

**पुणे, ता. ७ :** हिवाळ्यात गर्भवती महिलांनी त्यांच्या आहाराकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, कारण त्याचा परिणाम आई आणि बाळ दोघांच्याही विकासावर होतो. सर्दी, संसर्ग आणि थकवा गर्भवती महिलेवर आणि तिच्या बाळावरही याचा परिणाम होऊ शकतो. म्हणूनच, योग्य पोषण अत्यंत महत्त्वाचे आहे. गर्भवती महिलांनी हिवाळ्यात शरीराला उबदार ठेवणारे आणि आवश्यक पोषण देणारे पदार्थ खावेत. योग्य आहारामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि अशक्तपणा टाळता येतो.

गर्भवती महिलांनी त्यांच्या आहारात कोणत्या गोष्टींचा समावेश करावा? : गर्भवती महिलांनी हिवाळ्यात पालक, मेथी आणि मोहरीच्या भाज्यांसारख्या हिरव्या भाज्या खाव्यात, कारण त्यामध्ये लोह आणि फायबर भरपूर प्रमाणात असते. बदाम, अक्रोड आणि मनुका यांसारखे सुकेफळे ऊर्जा प्रदान करण्यास मदत करतात.

दूध आणि दुग्धजन्य पदार्थ कॅल्शियमचे चांगले स्रोत आहेत, जे बाळाच्या हाडांच्या विकासासाठी आवश्यक आहे.

संत्री, पेरू आणि सफरचंद यांसारखी हंगामी फळे व्हिटॅमिन सी प्रदान करतात, जी रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते.

मसूर, हरभरा आणि राजमा प्रथिनांची कमतरता पूर्ण करतात. तसेच गरम सूप आणि दलिया शरीराला उबदार ठेवण्यास मदत करतात.

गर्भवती महिलांनी आहारात कोणत्या गोष्टी टाळाव्यात?

गरोदरपणात, आई आणि बाळ दोघांच्याही आरोग्याचे रक्षण करण्यासाठी काही पदार्थ टाळणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यामध्ये जास्त तळलेले, मसालेदार आणि जंक फुड खाणे टाळा, कारण त्यामुळे आम्लपित्त आणि पचनाच्या समस्या उद्भवू शकतात.

खूप थंड आणि बर्फाचे थंड पदार्थ हानिकारक असू शकतात. कच्चे किंवा कमी शिजवलेले मांस, अंडी आणि मासे खाणे टाळा, कारण यामुळे संसर्गाचा धोका असतो.

चहा आणि कॉफी सारखे कॅफिन असलेले ड्रींक्सचे मर्यादित सेवन करा.

पॅकिंग केलेले आणि प्रक्रिया केलेले अन्न टाळा.

धूम्रपान, मद्यपान किंवा इतर कोणतेही मादक पदार्थ टाळा.

डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय कोणतीही औषधे किंवा हर्बल सप्लिमेंट्स घेऊ नका.

गर्भधारणेदरम्यान काळजी घेणे देखील महत्त्वाचे आहे.

दरम्यान, गर्भधारणेदरम्यान केवळ आहारच नाही तर योग्य काळजी घेणे देखील आवश्यक आहे. हिवाळ्यात स्वतःला उबदार ठेवा. पुरेशी झोप घ्या आणि हलका व्यायाम किंवा वॉक करा. तुमच्या डॉक्टरांकडून नियमित तपासणी करणे अत्यंत महत्वाचे आहे.

गरोदरपणात कमी पाणी पिण्याची चूक करू नका, कारण हिवाळ्यातही शरीराला हायड्रेशनची आवश्यकता असते. स्वच्छतेची काळजी घ्या आणि जर तुम्हाला काही समस्या आली तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# समाजाच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान अमूल्य : कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

### इंदापुरात गुणवंत शिक्षकांचा गौरव

**संतोष पवार**

पळसदेव, ता. ०७ : विद्यार्थ्यांना ज्ञानासोबतच मूल्यसंस्कार, योग्य मार्गदर्शन व प्रेरणा देणारा शिक्षक हा समाजाच्या जडणघडणीतील अत्यंत महत्त्वाचा घटक असून सक्षम व जबाबदार नागरिक घडविण्याचे महान कार्य शिक्षकांकडून केले जाते, असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीचे औचित्य साधून शनिवारी (ता. ०३) इंदापूर तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. वाघ पॅलेस, इंदापूर येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.



कृषिमंत्री भरणे पुढे म्हणाले की, सर्वच शिक्षक गुणवंत आहेत. शिक्षकच विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार देत समाज घडवण्याचे कार्य करतात. गुणवंत शिक्षक पुरस्कार हा शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची पावती आहे. पुरस्कारप्राप्त सर्व शिक्षकांचे त्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. यावेळी शिक्षक व विद्यार्थ्यांशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील तसेच पुणे मॉडेल स्कूल व वाढीव शाळांसाठी निधीची तरतूद करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचा सन्मान इंदापूरचे गटविकास अधिकारी सचिन खुडे यांच्या हस्ते करण्यात आला, तर नूतन नगराध्यक्ष भरत शहा यांचा सन्मान तालुका गटशिक्षणाधिकारी निलेश गवळी यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी निलेश गवळी यांनी केले. शिक्षकांच्या वतीने सुप्रिया आगवणे व संतोष हेगडे यांनी मनोगत व्यक्त केले.

या समारंभात सन २०२३ ते २०२५या तीन शैक्षणिक वर्षांतील सुमारे ११६ शिक्षकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गुणवंत शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच मुख्यमंत्री स्वच्छ सुंदर शाळा स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या शाळा तसेच अध्यक्ष चषक विजेत्या शाळांचा सन्मान करण्यात आला. आदर्श अधिकारी म्हणून गटविकास अधिकारी सचिन खुडे व गटशिक्षणाधिकारी निलेश गवळी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. याशिवाय आदर्श केंद्रप्रमुखांचाही गौरव करण्यात आला. यावेळी केंद्रप्रमुख, विस्ताराधिकारी तसेच तालुक्यातील सर्व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष हेगडे, सचिन देवडे व संतोष गदादे यांनी केले.

## स्वारगेट येथे ज्येष्ठाच्या पिशवीतून साडेतीन लाखांच्या दागिन्यांची चोरी

**स्वारगेट, ता. ७ :** ज्येष्ठ नागरिकाच्या पिशवीतून तीन लाख ४१ हजार रुपयांचे दागिने चोरून नेण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी एका ज्येष्ठ नागरिकाने दिलेल्या फिर्यादीनुसार चोरट्यांविरुद्ध स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ६६ वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे सातारा जिल्ह्यातील आहेत. कामानिमित्त ५ जानेवारी रोजी ते पुण्यात आले होते. स्वारगेट एसटी स्थानक परिसरात ते उतरले. सायंकाळी सातच्या सुमारास ते स्वारगेट परिसरातून निघाले होते. काही वेळानंतर त्यांनी पिशवीची तपासणी केली. तेव्हा पिशवीत ठेवलेले सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचे उघडकीस आले. पोलीस उपनिरीक्षक योगेश कोतकर तपास करत आहेत. स्वारगेट परिसरात प्रवाशांकडील दागिने, रोकड चोरीला जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

# उजनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मंत्रिस्तरावर हालचाली

### अभिजीत तांबिले यांच्या मागणीला यश

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता, ६ : इंदापूर तालुक्यातील उजनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या हक्कांबाबत माजी जिल्हा परिषद सदस्य अभिजीत तांबिले यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर पुणे प्राईमने बातमी प्रसिद्ध केली होती याच बातमीची दखल घेत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी तात्काळ दखल घेतली आहे. या विषयावर कृषी मंत्री भरणे यांची जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासोबत सविस्तर चर्चा झाली आहे.

या चर्चेच्या पुढील टप्प्यात आज होणाऱ्या कॅबिनेट बैठकीतही भरणे हे जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्याशी उजनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर थेट चर्चा करणार आहेत. तसेच या संदर्भात जलसंपदा विभागाकडे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी अधिकृत पत्रही सादर केले असल्याची माहिती अभिजीत तांबिले यांनी दिली.



तांबिले यांनी यापूर्वी कृषी मंत्री भरणे यांची भेट घेऊन उजनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वहिवाटी, मालकी हक्क आणि प्रशासनाकडून होणाऱ्या अडचणींबाबत सविस्तर निवेदन दिले होते. त्या निवेदनाची तात्काळ दखल घेत मंत्रिस्तरावर हालचाली सुरू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. यापूर्वी माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांच्या बाजूने सहानुभूतीपूर्वक विचार करून वहिवाटीचे आदेश दिले होते. त्या निर्णयाच्या अनुषंगाने आता पुन्हा शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, यासाठी शासनस्तरावर समन्वयातून ठोस मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

उजनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा हा प्रश्न हजारो कुटुंबांच्या उपजीविकेशी संबंधित असून, मंत्रिस्तरावर सुरू असलेल्या या हालचालींमुळे लवकरच सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास अभिजीत तांबिले यांनी व्यक्त केला आहे.

## अहिल्यानगर शहरात मतदारांना पैशांचे वाटप उघडकीस

**अहिल्यानगर, ता. ७ :** शहरात महापालिका निवडणुकीची रणधुमाळी तीव्र झाली असतानाच प्रभाग क्रमांक १० मध्ये मतदारांना पैशांचे वाटप सुरू असल्याचा गंभीर प्रकार मंगळवारी सकाळी उघडकीस आला. या प्रकरणी पोलीस व निवडणूक भरारी पथकाने संयुक्त कारवाई करत पैसे वाटपासाठी वापरली जात असलेली वाहने ताब्यात घेतली आहेत. तोफखाना परिसरातील सांबरगल्ली भागात काही उमेदवारांकडून खुलेआम पैसे वाटप केले जात असल्याचा आरोप भाजपच्या उमेदवारांनी केला. या संदर्भात माहिती मिळताच भाजप उमेदवारांनी तात्काळ तोफखाना पोलीस ठाणे तसेच भरारी पथकाशी संपर्क साधून तातडीच्या कारवाईची मागणी केली.



यानंतर पोलीस व भरारी पथकाने घटनास्थळी धाव घेत संयुक्त कारवाई केली. या कारवाईदरम्यान पैसे वाटपासाठी वापरली जात असलेली वाहने ताब्यात घेण्यात आली. निवडणुकीच्या तोंडावर प्रभाग क्रमांक १० मध्ये घडलेल्या या घटनेमुळे राजकीय वातावरण तापले असून, पैशांच्या जोरावर निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत उमेदवारांनी या प्रकाराचा तीव्र निषेध केला आहे.

## पुण्यात दुकानांचा दरवाजा उचकटून रोकड लंपास

**पुणे, ता. ७ :** दुकानांचे कुलूप तोडून चोरट्यांनी रोकड, तसेच मोबाइल संच लांबविल्याची घटना मॉडेल कॉलनीतील दीपबंगला चौकात घडली. याच परिसरातील एका खासगी रुग्णालयाचे कुलूप तोडून चोरट्यांनी रोकड लांबविल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत एका कपडे विक्रेत्याने फिर्याद दिलेल्या फिर्यादीनुसार चोरट्यांविरुद्ध चतु:शृंगी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मॉडेल कॉलनीतील दीपबंगला चौकात तक्रादाराचे कपडे विक्रीचे दुकान आहे. तेथून काही अंतरावर वेताळबाबा चौक परिसरात उपाहारगृह आहे. चोरट्यांनी ६ जानेवारी रोजी मध्यरात्री कपडे विक्री दुकानाचा दरवाजा उचकटला. गल्ल्यातील १० हजारांची रोकड चोरट्यांनी चोरली. शेजारी असलेल्या एका खासगी रुग्णालयाचा दरवाजा उचकटून चोरट्यांनी मोबाइल संच चोरून नेला. वेताळबाबा चौक परिसरातील एका उपाहारगृहाचे कुलूप तोडून चोरट्यांनी गल्ल्यातील रोकड अणि मोबाइल संच असा हजार रुपयांचा मुद्देमाल लांबविला. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी दीपबंगला चौक परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले असून, हवालदार शिर्के तपास करत आहेत.

# तालुकानिहाय अनुदानाची आकडेवारी जाहीर; राज्य सरकारचा मोठा निर्णय

**पुणे, ता. ७ :** राज्य सरकारकडून सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना औद्योगिक प्रोत्साहन अनुदान योजनेंतर्गत विविध सवलती दिल्या जातात. मात्र पुणे आणि पिंपरी-चिंचवड हा भाग औद्योगिकदृष्ट्या विकसित मानला जात असल्याने येथील बहुतांश एमएसएमई उद्योगांना आतापर्यंत या योजनेचा लाभ मिळत नव्हता. राज्य सरकारच्या नवीन उद्योग धोरणात विकसित भागातील एमएसएमईनाही या योजनेत समाविष्ट करण्यात आल्याने पुणे जिल्ह्यातील हजारो उद्योगांना याचा थेट फायदा होणार आहे. यामुळे उद्योगवाढीबरोबरच रोजगारनिर्मितीलाही चालना मिळेल.


औद्योगिक प्रोत्साहन अनुदान योजनेंतर्गत उद्योग सुरू केल्यानंतर व्याज अनुदान, जीएसटी परतावा, वीजशुल्कात सवलत तसेच मुद्रांक शुल्कात सवलत दिली जाते. याआधी ही योजना केवळ औद्योगिकदृष्ट्या मागास भागांसाठी लागू होती. विकसित भागांमध्ये ही योजना लागू नसल्याने पुणे जिल्ह्यातील अनेक उद्योग या लाभांपासून वंचित होते. आता हा निकष बदलण्यात आला असून विकसित भागातील एमएसएमईनाही या सवलती मिळणार आहेत.

राज्य सरकारकडून जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रांचे अ, ब, क, ड आणि ड प्लस असे पाच विभाग करण्यात आले आहेत. पुणे जिल्ह्यातील बहुतांश भाग अ वर्गात येत असल्याने आतापर्यंत येथे अनुदान मिळत नव्हते. नवीन धोरणामुळे नव्याने सुरू होणाऱ्या उद्योगांसोबतच सध्या कार्यरत उद्योगांच्या विस्तारासाठीही ही योजना उपयुक्त ठरणार आहे. या योजनेंतर्गत एमएसएमई उद्योगांसाठी स्थिर भांडवली गुंतवणूक मर्यादा २.५ कोटी ते १२५ कोटी रुपये इतकी आहे.

पुणे विभागाचे उद्योग सहसंचालक संदीप रोकडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात आता एमएसएमई क्षेत्राचा विस्तार वेगाने होईल. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ग्रिकल्चरचे महासंचालक प्रशांत गिरबने यांनी या निर्णयाचे स्वागत करत, या धोरणाची अंमलबजावणी पारदर्शक आणि प्रभावीपणे होणे गरजेचे असल्याचे सांगितले.

# पेट्रोल-डीझेल स्वस्त होणार?; कच्च्या तेलाच्या किमतीत १४ टक्के घसरणीची शक्यता

**मुंबई, ता. ७ :** भारतीय अर्थव्यवस्थेसाठी दिलासादायक बातमी असून आगामी काळात पेट्रोल आणि डीझेलच्या किमतीत मोठी कपात होण्याची शक्यता आहे. भारतीय स्टेट बँकेने प्रसिद्ध केलेल्या ताज्या अहवालानुसार कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण होऊ शकते. हा अहवाल सांगतो की, जून २०२६ पर्यंत कच्च्या तेलाचे दर प्रति बॅरल ५० डॉलरपर्यंत खाली येऊ शकतात. जागतिक स्तरावर तेलाचे दर कमी झाल्यामुळे भारतात इंधन स्वस्त होण्याचे संकेत मिळत आहेत.





एसबीआयच्या विश्लेषणानुसार, जर जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत १४% घसरण झाली, तर त्याचा थेट फायदा सामान्य ग्राहकांना मिळेल. सध्या भारतीय क्रूड बास्केटचा दर ६२.२० डॉलर असून तो ५३.३१ डॉलरपर्यंत घसरण्याचा अंदाज आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय मंदीचा फायदा भारतीय वाहनधारकांना लवकरच मिळू शकतो. २०२६ च्या पहिल्या तिमाहीत ब्रेंट क्रूड देखील ५५ डॉलरच्या खाली येण्याची चिन्हे आहेत.

इंधन स्वस्त झाल्यामुळे देशातील महागाई दर देखील कमी होण्यास मदत होणार आहे. अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२७ मध्ये भारतातील किरकोळ महागाईचा दर ३.४% च्या खाली येऊ शकतो. कच्च्या तेलाच्या किमती सध्या कमी होत असल्याचे तांत्रिक आलेखावरून स्पष्ट होत आहे. यामुळे वाहतूक खर्च कमी होऊन सर्वसामान्यांचे बजेट सुधारण्यास मदत होईल. एकूणच, जागतिक बाजारातील या बदलांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मोठी उभारी मिळण्याची शक्यता आहे.

# जेम्स लेनच्या वादग्रस्त पुस्तकावरून ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीची माफी

### पुरावे नसल्याचे म्हणत २२ वर्षांनी झाली उपरती

**पुणे, ता. ७ :** छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्याबद्दल चुकीचे लिखाण केल्याप्रकरणी ऑक्सफोर्ड युनिवर्सिटी प्रेसने तब्बल २२ वर्षांनंतर जाहीर माफी मागितली आहे. हिंदू किंग ऑफ इस्लामिक इंडिया या २२ वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह मजकूर छापण्यात आला होता. त्याबद्दल ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस इंडियाने छत्रपतींचे थेट तेरावे वंशज खासदार उदयनराजे भोसले यांची माफी मागितली आहे. प्रकाशन संस्थेने माफीनाम्याची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे.




ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने १३ फेब्रुवारी २००३ रोजी हे पुस्तक प्रकाशित केले होते. अमेरिकन इतिहास अभ्यासक जेम्स लेन यांनी ते लिहिले होते. पुस्तकाच्या ३१, ३३, ३४ आणि ९३ या पानांवर छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांची आई राजमाता जिजाऊंबद्दल आक्षेपार्ह मजकूर लिहिण्यात आला होता.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी त्याच वर्षी ऑक्सफोर्डला निवेदन पाठवून तीव्र निषेध नोंदवला होता. पुण्यात या पुस्तकाविरोधात हिंसक आंदोलने देखील झाली होती. अखेर शिवप्रेमींच्या भावनांचा सन्मान करत ऑक्सफोर्डने सार्वजनिक सूचनेद्वारे आपली चूक कबूल केली असून दिलगिरी व्यक्त केली आहे.

जेम्स लेन हे अमेरिकेत इतिहास विषयाचे प्राध्यापक आहेत आणि त्यांच्या या वादग्रस्त लिखाणामुळे अनेक वर्षांपासून कायदेशीर लढा सुरू होता. चुकीचा इतिहास मांडणाऱ्या प्रकाशकांविरुद्ध हा एक मोठा विजय मानला जात आहे. इतिहासाची मोडतोड करणाऱ्या इतिहास प्रवृत्तींना या माफीनाम्यामुळे चपराक बसली असून सोशल मीडियावर या निर्णयाचे स्वागत होत आहे.

# मागची पानं पलटायची तर खुशाल पलटा

### फडणवीस-बावनकुळेंच्या इशाऱ्याला अजित पवारांचे सडेतोड उत्तर

**पुणे, ता. ७ :** पुण्यातील जाहीर सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना इशारा दिल्यानंतर आज अजित पवारांनी या वक्तव्याला प्रत्युत्तर दिलं आहे. प्रत्येकाला पान चाळण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. तो अधिकार त्यांनी वापरावा. मी माझी भूमिका मांडतो, ते त्यांची भूमिका मांडतील, असं अजित पवार म्हणाले.

दरम्यान, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही फडणवीसांच्या वक्तव्याचा संदर्भ देत अजित पवारांना पुन्हा इशारा दिला. मागची पानं पलटवली तर अजित पवारांनाही बोलता येणार नाही. ७० हजार कोटींचं प्रकरण अजून न्यायप्रविष्ठ आहे, असं बावनकुळे म्हणाले. यावर अजित पवारांनी फार न वाढवता थोडक्यात उत्तर दिलं.



मी उमेदवारांची बैठक घेतली आहे. त्यांचं म्हणणं ऐकून घेतलं. एकोप्याने प्रचार करा, बोलताना काळजी घ्या, कुणालाही दुखावेल असं बोलू नका, अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत. राज्यात आणि केंद्रात आम्ही महायुती म्हणून एकत्र आहोत. पण महानगरपालिकेच्या निवडणुका आम्ही वेगवेगळ्या लढतोय. गेल्या नऊ वर्षांत पिंपरी-चिंचवडची काय अवस्था झाली, हे सगळ्यांना माहिती आहे.

भाजपच्या काळात महानगरपालिका कर्जबाजारी झाली, नियोजनशून्य कारभार झाला. आम्ही वर्षांत शहरात अनेक नवनवीन गोष्टी आणल्या आहेत. मेट्रोचं भूमिपूजन पंतप्रधानांच्या हस्ते झालं असलं, तरी त्या वेळी महापौर राष्ट्रवादी काँग्रेसचेच होते. कोणाला जीवाला धोका वाटत असेल, तर उमेदवाराला सुरक्षा दिली जाते. पोलिसांकडे मागणी केली, तर सुरक्षा मिळते. मी फक्त महानगरपालिकेच्या कारभाराबद्दल बोललो आहे आणि त्याचे पुरावेही दिले आहेत. इतर कोणतेही आरोप केलेले नाहीत. मात्र मीडियाने वक्तव्य फुगवून वेगळ्याच पद्धतीने दाखवलं, त्यामुळे त्यांच्या पक्षातील नेत्यांकडून प्रतिक्रिया आल्या.

दरम्यान, पान चाळण्याचा अधिकार त्यांना संविधानाने दिला आहे. पण शेवटी जनता जनार्धन आहे. सगळ्या बाजू ऐकून जनता निर्णय देईल. आता मी फक्त संबंधित महानगरपालिकेतील मुद्द्यांवरच बोलणार आहे, असं म्हणत अजित पवारांनी आपली भूमिका पुन्हा स्पष्ट केली.